# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१ - २७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०८/०८/२०२२

# प्रेसनोट

देशात व राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचा उपक्रम संपन्न होत असतानाच, केंद्र सरकारने "माझी माती माझा देश" या नवीन उपक्रमाची घोषणा केलेली आहे. या घोषणेनुसार प्रत्येक राज्यामध्ये आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम निर्माण व्हावे याबाबत कार्यक्रम घेणे अपेक्षित आहे. मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या अध्यक्षतेखाली "माझी माती, माझा देश" सदर उपक्रम ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध प्रकारचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

दिनांक ०८ ऑगस्ट हा उल्हासनगर स्थापना दिवस असल्याने मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख साहेब यांच्या हस्ते स्वातत्र्य सेनानी श्रीमती मिता अनाथबंधू चक्रवर्ती व श्रीमती सुचेता बाबुराव जेरे यांच्या कुटुंबियांचा सत्कार करण्यात येवून व माझी माती, माझा देश हा अनावरण सोहळा व शहर स्थापना दिवसा साजरा करण्यात आला. उल्हासनगर महानगरपालिका, रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर, सुखरामनी फाऊंडेशन, एस.एस.टी.कॉलेज, पद्मा ॲकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सद्याची पिढी वेगवेगळ्या व्यसनाने व्यसनाधीन होत असून, व्यसनमुक्तीसाठी प्रभाग समिती १ भगवंती नावानी स्टेज ते विराट अंबे स्पोर्ट क्लब पर्यंत रॅली आयोजित केली. सदर रॅली विराट अंबे येथे आल्यानंतर एस.एस.टी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नशामुक्ती पथनाटय सादर करून जनजागृती केली. या रॅलीमध्ये मा.आमदार, नगरसेवक, स्वयंसेवीसंस्था, महापालिका अधिकारी व कर्मचारी व मोठया संख्येने शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी व यांनी सहभाग केला होता.

या कार्यक्रमास मा. अतिरिक्त आयुक्त (सेवा) डॉ. करुणा जुईकर, अतिरिक्त आयुक्त (शहर) श्री. जमीर लेंगरेकर, उपायुक्त श्री. अशोक नाईकवाडे, डॉ. सुभाष जाधव, प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी श्री.गणेश शिंपी, श्री. दत्तात्रय जाधव, श्री. खतुरानी, श्री. जेठानंद करमचंदानी व विभाग प्रमुख म्हणून श्रीम. श्रध्दा बाविस्कर, श्री. अंकूश कदम, श्री. विनोद केणे, श्रीम. दिप्ती लादे, हे उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले व महापालिका सचिव सौ. प्राजक्ता कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक अजीज शेख यांनी दिनांक ९ ते १५ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत प्रत्येक शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापना तसेच नागरिकांनी "माझी माती, माझा देश" (merimaatimeradesh.gov.in) या वेबसाईटवर हातात माती/मातीचे दिवे घेवून "पंच प्रण प्रतिज्ञा" करतांना सेल्फी फोटो अपलोड करण्याचे सुचित केले व सध्याची पिढी व्यसनाच्या मागे धावत असून त्यासाठी आळा घालणे आवश्यक आहे, यासाठी सर्व शहरवासीयांना व्यसनमुक्तीचा संदेश दिला. तसेच सर्व शहरवासीयांना दिनांक १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविण्याबाबत आवाहन केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.